# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ३/२०१४-१५/५८ दिनांक : ३०.०५.२०१४

**<u>आदेश केस क्र.३/१४-१५</u>**

श्री. प्रकाश महादेव औताडे,
रा.अचकनहळ्ळी, ता.जत,
जि.सांगली.

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ.

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, जत.

विरुध्द पक्षकार

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री.बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. प्रकाश महादेव औताडे,यांनी मंचाकडे वितरण कंपनीच्या जत उपविभागाविरुध्द दि.०७.०४.२०१४ रोजी गा-हाणे दाखल केले. ग्राहकाने शेतजमीन गट क्र.७१/२ मध्ये शेतीपंपाचे नवीन वीज कनेक्शन मिळण्यासाठी चलन रु.५०५०/- पावती क्र.८८१३०४६ दि.२८.०६.२०१२ रोजी भरले. कृती मानके विनियमानुसार वितरण वाहिनीचा विस्तार असलेने तीन महिन्यात म्हणजे दि.२७.०९.२०१२ पर्यंत वीजजोडणी मिळावयास हवी होती. परंतु वितरण कंपनी सुरक्षित वीजजोडणी देत नाही. अंतर्गत कक्ष,सांगली येथे तक्रार क्र.३०१ ने दाखल केली आहे. प्रस्तुत अपील मंचाकडे दाखल केले आहे. मंचाकडून अपेक्षित मदत अशी हवी आहे की कृती मानकेनुसार नवीन वीजपुरवठा निश्चित कालावधीमध्ये द्यावा असे नेमस्त केले आहे. जेष्ठताक्रमांकानुसार वीजपुरवठा देण्याची तरतुद विद्युत कायदा आयोगाच्या विनियमात नाही. CGRF २००६ कलम ८.२ नुसार निश्चित कालावधीत गा-हाणे दूर करण्याचे अधिकार मंचास आहेत. त्यामुळे तात्काळ वीजपुरवठा करण्याचे आदेश व्हावेत.

वितरण कंपनीने मंचास दाखल केलेल्या लेखी अहवालात ग्राहकाने पैसे भरल्याचे मान्य केले. सदर कनेक्शनसाठी ०.४८ किमी. लघुदाबवाहिनी उभी करावी लागत आहे. ग्राहकाचा जेष्ठतायादीप्रमाणे प्रलंबित यादीत ९१० वा क्रमांक आहे. दोन वर्षांची प्रलंबित यादी १४०३ लोकांची आहे. वितरण कंपनी २०११-१२ या वर्षामध्ये लघुदाबवाहिनीद्वारा कराव्या लागणा-या शेतीपंपाच्या वीजपुरवठ्याचे काम करीत आहे. वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ ची कामे इंफ्रा स्किममध्ये मंजुर असून कार्यकंत्राटी आदेश देण्याची प्रक्रिया चालू आहे. जेष्ठतायादीप्रमाणे वीजपुरवठा केला जाणार असल्याने केस निकाली काढावी.

सदर तक्रारीची सुनावणी आज दि.२६.०५.२०१४ रोजी घेण्यात आली. तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री.खापरे उपस्थित नव्हते. वितरण कंपनीतर्फे श्री.पाटील, विभागीय कार्यालयाचे अभियंते व जत उपविभागाचे स्थानिक अधिकारी उपस्थित होते. वितरण कंपनीने आपल्या लेखी अहवालात कथन केले व मंचासमोर सांगितले की Supply Code ४.४ नुसार जेष्ठता यादीप्रमाणे काम करणेत येईल.

खालील मुद्दा न्यायनिर्णयासाठी मंचाकडे उपस्थित होतो.

**मुद्दा क्र.१:** ग्राहकाने तक्रारीत मागणी केलेप्रमाणे त्यास वीजपुरवठा तातडीने देणेचे आदेश करणे योग्य व कायदेशीर होईल काय ?

**उत्तर :** नाही.

**मुद्दा क्र.२:** आदेश.

**उत्तर:** अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

उभय बाजुच्या लेखी कथनानुसार ग्राहकाने शेतीपंपासाठी नवीन कनेक्शनसाठी चलन जून,१२ मध्ये भरले आहे. वितरण वाहिनीचा विस्तार आहे. त्यासाठी ०.४८ किमी.लघुदाबवाहिनी उभी करावी लागते. कृती मानकेतील तरतुदीनुसार ३ महिन्यात म्हणजे दि.२७.०९.२०१२ रोजी वीज जोडणी मिळावयास हवी होती. परंतु कृती मानकातील इतर तरतुदी पहाता वितरण कंपनी कृती मानकांचे पालन करण्यास अपयशी ठरली तर ग्राहकास विलंबापोटी भरपाई मागण्याचा अधिकार आहे. ग्राहकाने विलंबापोटी गा-हाणे दूर झाल्यानंतर भरपाई मागण्याचा हक्क राखून ठेवला आहे व मंच त्यास तशी परवानगी देत आहे. हे खरे की CGRF Regulation Section ८.२ नुसार मंचास ठराविक मुदतीत गा-हाणे दूर करण्याचे आदेश देणेचे अधिकार आहेत. त्याचवेळेस मा.वीज नियामक आयोगाने २००५ रोजी मंजुर केलेले पुरवठा अधिनियम ४.४ नुसार वितरण कंपनी शक्यतो **"first come, first served" basis** या तत्वावर कुठल्या ही Tariff Category मधील वीजजोडणी (Release) देऊ शकतात याचा ही विचार करावा लागेल. त्यामुळे ग्राहकाची तातडीने वीजजोडणी आदेशाची मागणी फेटाळण्यात येत आहे. तसेच कंपनीने लेखी अहवालात कथन केलेप्रमाणे वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ या कालावधीतील प्रीपेड ग्राहकांची संख्या व ग्राहकाचा जेष्ठता क्रमांक ९१० आहे याचा विचार करता तसेच सध्या वितरण कंपनीकडे सन २०११-१२ मधील लघुदाबवाहिनीच्या वीजजोडणीचे काम चालू आहे. त्यामुळे तात्काळ वीजजोडणीचे आदेश देणे उचित होणार नाही असे मंचाचे मत आहे. म्हणून मुद्दा क्र.१ चे उत्तर **नाही** असे देण्यात येते.

## आदेश

१.	तक्रारदाराची तात्काळ वीजपुरवठा देण्याच्या आदेशाची मागणी फेटाळण्यात येत आहे.

२.	विद्युत वितरण कंपनीने ग्राहकास कायदेशीर व सुरक्षित वीज लाईन ओढून जेष्ठताक्रमांकानुसार वीजजोडणी द्यावी व तसा अहवाल मंचास द्यावा. विलंबापोटी भरपाई ग्राहक स्वतंत्ररित्या मागु शकतो.

३.	सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४.	या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य .. सही/-

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

दिनांक :३०.५.२०१४

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष

श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य .. सही/-

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष